महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे वतीने प्रकाशित.

क्रमांक ना. बँका/डी-४/क-६७/लाभांश/९४,
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांचे कार्यालय,
दिनांक : २९-८-१९९४

**विषय : नागरी सहकारी बँका / नागरी सहकारी पतसंस्था / सेवकांच्या सहकारी पतसंस्था यांचे सभासदांना द्यावयाच्या लाभांशाबाबत.**

# परिपत्रक

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ६७ मध्ये दुरुस्ती झालेली असून नविन तरतूदी प्रमाणे कोणत्याही नागरी सहकारी बँकेस / पतसंस्थेस तिच्या सभासदांना १५% पर्यंत लाभांश वाटप करता येईल. परंतु १५% पेक्षा अधिक दाराने लाभांश वाटप करावयाचा असल्यास, या कार्यालयाची आगावू परवानगी घेतल्याशिवाय अशी रक्कम संस्थांना वाटता येणार नाही. हे या कार्यालयाने क्रमांक एडीएम/२-अे/डेलीगेशन पॉवर /९४, दिनांक ११-२-९४ च्या इंग्रजी पत्रान्वये पाठविलेल्या महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागाच्या नोटीफिकेशन मध्ये नमूद केलेले आहे.

सदरच्या दुरुस्तीमुळे या कार्यालयाने यापूर्वी दिनांक १४-१०-८६ व २०-७-८७ च्या परिपत्रकान्वये दिलेल्या सूचना / निकष कालबाह्य ठरले आहेत.

तेव्हा नवीन तरतुदीनुसार १५% पेक्षा अधिक दराने लाभांश वाटप करण्यास परवानगी देण्यासंदर्भात खालील प्रमाणे सुधारित निकष / मार्गदर्शक सूचना प्रस्तृत करण्यात येत आहेत.

१) नागरी सहकारी बँका / पतसंस्था / सेवक पतसंस्था यांचे मागील लगतच्या तीन वर्षाचे थकबाकीचे प्रमाण १०% पेक्षा जास्त असता कामा नये.

२) संबंधीत नागरी सहकारी बँका / पतसंस्था / सेवक पतसंस्था यांचे गेल्या तीन वर्षाचे लेखा परिक्षण वर्ग सतत "अ" असणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे वतीने प्रकाशित.

जा. क्र. ना. बँका/डी-४/टी-७/लाभांश/प/२०००
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांचे कार्यालय
दिनांक : १८-१०-२०००

# परिपत्रक

## विषय : नागरी सहकारी बँका / नागरी सहकारी पतसंस्था / पगारदार सेवकांच्या सहकारी पतसंस्था यांचे सभासदांना द्यावयाच्या लाभांशाबाबत.

नागरी सहकारी बँका / पतसंस्था / सेवक पतसंस्था यांना १५% पेक्षा अधिक दराने लाभांश वाटप करण्याबाबत या कार्यालयाचे दिनांक २९-८-९४ चे परिपत्रकान्वये निकष ठरवून दिलेले आहेत. त्या नुसार ज्या संस्थांची थकबाकी ५% पेक्षा कमी आहे. अशा संस्थांना जास्तीत जास्त २०% दराने लाभांश वाटपास मंजुरी देता येते. तथापि २०% पेक्षाही जास्त दराने लाभांश वाटपास मंजुरीसाठी प्रस्ताव शिफारशींसह या कार्यालयाकडे प्राप्त होतात. परंतु सदरील प्रस्ताव वरील निकषात बसत नसल्याने किंवा वरील परिपत्रकात २०% पेक्षा अधिक दराने लाभांश वाटपास मंजूरी देण्याची तरतूद नसल्याने या कार्यालयाकडून नामंजूर करण्यात येतात. बऱ्याच प्रस्तावांमध्ये संस्थेची थकबाकी २ ते ३ टक्क्याहून कमी असल्यामुळे संबंधीत संस्थेची जादा दराने लाभांश मंजुरी देण्याची मागणी कायम राहते. त्यामुळे या कार्यालयाने या पूर्वी दिनांक २९-८-९४ च्या परिपत्रकान्वये ठरवून दिलेले निकष बदलणे अत्यावश्यक झाले आहे. तेव्हा या संदर्भात खालीलप्रमाणे निकष / मार्गदर्शक सूचना प्रस्तृत करण्यात येत आहेत.

१) संबंधीत नागरी सहकारी बँका / पतसंस्था / सेवक पतसंस्था यांचे मागील लगतच्या तीन वर्षातील थकबाकीचे प्रमाणे १०% पेक्षा जास्त असता कामा नये.

२) संबंधीत नागरी सहकारी बँका / पतसंस्था / सेवक पतसंस्था यांचे मागील लगतच्या तीन वर्षाचे लेखापरीक्षण वर्ग सतत 'अ' असणे आवश्यक आहे.

३) संबंधीत बँकेने / संस्थेने त्यांचे लेखापरीक्षण दोष दुरुस्ती अहवाल सहकार खात्याचे संबंधीत नोंदणी अधिकाऱ्यांना विहीत मुदतीत सादर केले असले पाहिजेत.

४) संबंधीत बँकेने / संस्थेने कायदा, कानून व पोटनियम यातील तरतुदीप्रमाणे आवश्यक त्या सर्व तरतुदी केल्या असल्या पाहिजेत. तसेच आवश्यक ते सर्व निधी उभारले असले पाहिजेत. निव्वळ नफा काढण्यापूर्वी कायद्यातील व पोटनियमातील तरतुदीप्रमाणे सर्व तरतुदी व वजावटी केल्या असल्या पाहिजेत. या बाबत प्रकरणाची शिफारस करणाऱ्या अधिकाऱ्यांनी आर्थिक पत्रकांची तपासणी करुन स्पष्ट अभिप्राय दिले पाहिजेत.

५) संबंधीत संस्थेने / बँकेने सहकार खात्याने तयार केलेले नमुना उपविधी स्विकारले असले पाहिजेत.

६) संबंधीत बँकेने / संस्थेने मागासवर्गीय कर्मचाऱ्यांचा अनुशेष भरला असला पाहिजे. त्या संबंधीची माहिती प्रस्तावात असणे आवश्यक आहे.

७) संबंधीत बँकेने रिझर्व्ह बँकेच्या तपासणीमधील दोषांची पूर्तता करुन त्याचा पूर्तता अहवाल विहीत मुदतीत सादर केला असला पाहिजे.

८) संबंधीत बँकेने रिझर्व्ह बँकेच्या सूचनांप्रमाणे एन. पी. ए. साठी (उत्पादन क्षमता नसलेल्या खात्यांसाठी) तरतूद केलेली असली पाहिजे. तसा एन. पी. ए. ची तरतूद १००% केल्याचा लेखापरीक्षकांनी प्रमाणीत तक्ता प्रस्तावात दिला पाहिजे.

९) संबंधीत बँकेने / संस्थेने मागील लगतची तीन वर्षे कोणत्या दराने लाभांश वाटप केला आहे. या बाबतची माहिती प्रस्तावामध्ये दिली असली पाहीजे.

१०) १५% पेक्षा जास्त दराने लाभांश वाटप करणे संबंधी व नफा विभागणी संबंधी वार्षिक साधारण सभेने अंतिम निर्णय घेणे बंधनकारक राहील.

११) संबंधीत बँकेचे / संस्थेचे ज्या वर्षासाठी वाढीव दराने लाभांश द्यावयाचा आहे. त्या वर्षाचे ताळेबंद / नफातोटा पत्रक ही आर्थिक पत्रके (वार्षिक अहवाल) प्रस्तावात असली पाहिजेत. ती लेखापरीक्षक अथवा अंतर्गत लेखापरिक्षकाने पारीत केली असली पाहिजेत.

१२) संबंधीत नागरी सहकारी बँका / पतसंस्था / सेवक पतसंस्था यांची लगतच्या ३१ मार्च अखेरची (ज्या वर्षासाठी वाढीव दराने लाभांश द्यावयाचा आहे त्या वर्षाच्या अखेरची) थकबाकीचे प्रमाण व लाभांशाचे वाटप यांचे प्रमाण खालीलप्रमाणे असावे.

अ) संस्थेचे थकबाकीचे प्रमाण ३% व ३% पेक्षा कमी आहे अशा प्रकरणांमध्ये लाभांश २५% पर्यंत.

ब) संस्थेचे थकबाकी प्रमाण ३% पेक्षा जास्त व ५% पेक्षा कमी आहे अशा प्रकरणामध्ये लाभांश २१% पर्यंत.

क) संस्थेचे थकबाकीचे प्रमाण ५% पेक्षा जास्त व ७.५०% पेक्षा कमी आहे. अशा प्रकरणांमध्ये लाभांश १९% दरापर्यंत .

ड) संस्थेचे थकबाकीचे प्रमाण ७.५०% पेक्षा जास्त व १०% पेक्षा कमी आहे. अशा प्रकरणामध्ये लाभांश १७% दरापर्यंत.

वरील प्रमाणे लाभांश वितरणाचे शिफारस करुन नोंदणी अधिकाऱ्यांनी प्रस्ताव कार्यालयास मान्यतेसाठी सादर करावा.

ज्या प्रकरणामध्ये वरील अटींची पूर्तता होत नसेल अशी कोणतीही प्रकरणे कोणत्याही परिस्थितीत खास बाब म्हणून अथवा शिफारस करुन पाठवू नयेत.

प्रकरणाची शिफारस करताना संबंधीत नोंदणी अधिकाऱ्यांनी त्यामध्ये वरीलप्रमाणे अटी निकषांविषयी स्पष्टपणे अभिप्राय देवून ती या कार्यालयास सादर करावीत.

ज्या बँका / संस्था या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येतात (राज्यस्तरीय) अशा बँकांचे / संस्थांचे मुख्यालय ज्या जिल्ह्यात आहे त्या जिल्ह्याच्या जिल्हा उपनिबंधकांनी संबंधीत बँकांच्या / संस्थांच्या प्रकरणाची वरील प्रमाणे तपासणी करुन अभिप्राय द्यावेत व आपल्या शिफारशीसह प्रस्ताव या कार्यालयास मान्यतेसाठी सादर करावेत.

मा. सहकार आयुक्त
यांचे मान्यतेने

सही/-
अप्पर आयुक्त व निबंधक
सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे.